# प्रकरण दुसरे

## 'भूकबळी' आशय व स्वरूप

# प्रकरण दुसरे

# 'भूकबळी' आशय व स्वरूप

१९६० पासून दलित-ग्रामीण साहित्याची निर्मिती होत असून ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्यातील सवतासुभा नाहिसा करणारा ग्रामीण आणि दलित साहित्य प्रकाराची सरमिसळ करून कथा लिहिणारा एक वर्ग निर्माण झालेला दिसून येतो. त्यामध्ये वामन होवाळ, भास्कर चंदनशिव, उत्तम बंडू तुपे, योगिराज वाघमारे यासारख्या साहित्यिकांची एक परंपरा निर्माण झाल्याचे दिसून येते. ग्रामीण व दलित जाणिवेशी एकरूप होऊन ग्रामीण भागाशी संलग्न असणाऱ्या गावकुसाबाहेरील जीवन-जाणिवांना त्यांनी कथांच्या माध्यमातून अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ही परंपरा पुढे कथा, कादंबरी लिहिणाऱ्यातून विकसित करणारे विलास सिंदगीकर हे महत्त्वाचे कथाकार ठरतात. त्यांचा 'भूकबळी' हा २००३ मध्ये प्रकाशित झालेला ग्रामीण व दलित जाणिवेचे चित्रण करणारा महत्त्वाचा कथासंग्रह ठरतो. 'भूकबळी' या कथासंग्रहाचे आशय व स्वरूप हे महत्त्वाचे आहे. सिंदगीकरांनी ग्रामीण दलित संवेदनाच्या सीमारेषेवरती जाऊन पुरोगामी विचाराने, मानवतावादी दृष्टिकोन ठेऊन एक वेगळी विचारप्रणाली, जीवनदृष्टी वास्तववादी दृष्टिकोनातून चितारलेली आहे. आपल्या 'भूकबळी' या कथासंग्रहातून विलास सिंदगीकरांनी समाजात उपेक्षित मानल्या गेलेल्या व्यक्तींना सोसाव्या-भोगाव्या लागणाऱ्या यातना, व्यथा, वेदना व्यक्त केल्या आहेत. या उपेक्षित माणसांच्या पुढे पहिला प्रश्न उभा राहतो तो भूकेचा. ही भूक भागविण्यासाठी, पोटाची आग विझविण्यासाठी त्याला आपला जीव गमवावा लागतो. अशा माणसांचे दु:ख अतिशय सुक्ष्मपणे या कथासंग्रहातून शब्दांकित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. दलित जीवनाबरोबर पांढरपेशा समाजातील ही चित्रण केलेले दिसून येते. माणूस आणि या माणसांच्या वाट्याला आलेले दारिद्र्य, उपासमार, बलात्कार यांचे दाहक चित्रण अतिशय वास्तववादी भूमिकेतून चित्रित केले आहे. याचा प्रत्यय त्यांच्या 'भूकबळी' या कथासंग्रहातील एकूण पधंरा कथांचा आढावा घेतल्यास दिसून येतो. प्रस्तुत प्रकरणात 'आशय' या संकल्पनेच्या व्याख्या व तिचे

स्वरूप त्यानंतर आशयाची अभिव्यक्ती व्याख्या व स्वरूप, 'भूकबळी' या कथासंग्रहामधील व्यक्तिरेखा, भाषाशैली यांच्या माध्यमातून आशय स्वरूप व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

## आशय : व्याख्या व स्वरूप :

कोणत्याही कलाकृतीत लेखक आपला जीवनविषयक दृष्टिकोन मांडत असतो. आपल्या लेखनात यशस्वीरित्या वास्तव जीवनाचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न लेखकच करत असतो. त्यामुळे कथेत वास्तवतेची पुसटशी जाणीव वाचकाला करून दिली जाते. कथेत अशी वास्तवता आणण्यासाठी कथेच्या विषयाबरोबर कथेचे आशय महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे आशय या संकल्पनेचा विचार करताना त्याच्या व्याख्या पुढीलप्रमाणे घेतल्याचे दिसून येते.

१. लुडविंग विटगिनस्टिन - "भाषेत केलेला शब्दाचा उपयोग म्हणजे त्याचा आशय."[१]

२. "एखादी स्थूल अथवा व्यापक विचारप्रणाली कल्पना अथवा संकल्पना, अनुभूती किंवा तत्त्व म्हणजे साहित्यकृतीचे आशयसूत्र."[२]

३. बर्ट्रंड रसेल : "शब्दाला कधी कमी तर कधी जास्त, अस्पष्ट असा आशय असतो, पण तो त्याचा उपयोग पाहूणच निश्चित करता येतो; उपयोग पहिल्यांदा पाहावयास मिळतो. व त्यातून त्याचा आशय गाळूण काढतात."[३]

४. प्रभाकर बरवे : "कोणत्याही कलाकृतीचं प्रयोजन हाच त्या कलाकृतीचा आशय असतो."[४]

म्हणजेच जीवनविषयक दृष्टिकोनातून हे आशय साकार होत असते. लेखकाला अभिप्रेत असलेला जीवनार्थ म्हणजेच त्या साहित्यकृतीचे आशय होय. आशय प्रभावीपणे, वास्तववादी पणाने प्रकट होणे हे स्थूलमानाने कथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

## आशय, अभिव्यक्ती व्याख्या व स्वरूप :

कोणत्याही साहित्यकृतीचा विचार करीत असताना आशय व अभिव्यक्ती याचा उल्लेख आत्मा व शरीर असा केला जातो. "साहित्यिक आपल्या साहित्यकृतीत पात्रे, घटना, प्रसंग, वातावरण यांची मांडणी भाषेच्या माध्यमातून करतो आणि त्या 'आशयाला' साहित्यरूप

प्राप्त करुन देतो. हे साहित्यरूप म्हणजेच त्या आशयाची अभिव्यक्ती असते."[५] अभिव्यक्तीचे विषय, घटना, प्रसंग, पात्रांची मांडणी, वातावरण आणि या सर्वांचे घटक परस्पर संबंध हे अभिव्यक्तीचे घटक मानले जातात आणि आशयाला व्यक्त करण्यासाठी कथाकार त्या घटकांचा यशस्वीपणे वापर करतो. अभिव्यक्तीलाचा अनुभव असेही म्हटले जाते आणि या अनुभवातूनच आशयाचा गाभा व्यक्त होतो.

## 'भूकबळी' कथासंग्रहातील कथांचे आशय व स्वरूप :

व्यक्तिचित्रणामध्ये पात्र हा घटक महत्त्वाचा मानला जातो. पात्रांचा विचार हा आशयाच्या अनुषंगाने करावा लागतो. कथाकारांच्या अनुभवविश्वातून आलेली व्यक्तिरेखा कथेची संपन्नता वाढविते. कथेमध्ये घटना प्रसंगाइतकेच व्यक्तीच्या स्वभाव चित्रणाला महत्त्व असते. एखाद्या व्यक्तीचा स्वभाव, अंर्तमन, जीवन जगण्याची पद्धत याचे चित्रण करून कथाकार ती व्यक्ती जिवंतपणे वाचकांच्या मनात उभी करते. कथा, कादंबरी हे वाङ्मय प्रकार भिन्न आहेत. कारण कथेच्या मानाने कादंबरीतील व्यक्तिचित्रणाचा आवाका खुप मोठा असतो. पात्र प्रसंगाची विपुलता असते. त्या तुलनेने कथेचा आवाका संकुचित असतो, "कथाकार एखाद्या व्यक्तीची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवन पद्धती इत्यादींच्या चित्रणातून त्या व्यक्तीची एक प्रतिमा कथेत निर्माण करतो. व्यक्तीच्या या शब्दरूप प्रतिमेला 'पात्र' असे म्हटले जाते."[६] कथेतील पात्र शब्दरूप असतात. म्हणजेच प्रत्यक्षातील माणसांच्या अनुकृतीतून निर्माण झालेल्या प्रतिमा असतात. कथाकारांच्या दृष्टीने मर्यादित अवकाशात मोजक्या साधनांनी प्रयोजनपूर्ण पात्रनिर्मिती करणे हे आव्हाण असते. व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून कथाकार व्यक्तीचे विविध पैलू चित्रित करण्याचा प्रयत्न करतो. विलास सिंदगीकरांनी आपल्या कथांच्या माध्यमातून आशयाच्या अनुषंगाने स्त्री-पुरूषांच्या वेगवेगळ्या मनोवस्थांचा मागोवा घेतलेला आहे.

## स्त्री अस्तित्वाचे चित्रण करणाऱ्या कथा :

विलास सिंदगीकरांनी आपल्या कथांमधून दलित वर्गाबरोबर पांढरपेशा वर्गातील स्त्रियांचे दु:ख, व्यथा, वेदना, समरसतेने व सखोलपणे मांडलेले आहेत. त्यांच्या कथेतील

'स्त्री' ही अनेक नात्यांना स्पर्श करून जाताना दिसते. स्वत:पेक्षा आपले कुटुंब, कुटुंबातील व्यक्ती यांना प्राधान्याने स्थान देते कथासंग्रहातील 'स्त्री' ही या विविध रूपातील आहेत. नियतीचे, एका मानसिक अवस्थेचे शापित जीणं जगताना, उद्ध्वस्त होताना, तर कधी त्यावर मात करताना दिसते. त्याचप्रमाणे स्वत:च्या अस्तित्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करताना दिसून येते.

## वास्तववादी घटना आणि दु:ख :

'भेट' या कथेत वास्तववादी घडलेल्या घटनेचा दु:खाची झालर आहे. स्वत: लेखकाने प्रवास करताना अनुभवलेली घटना आहे. निराधार, अगतिक, निरापराध, नियतीपुढे हतबल झालेली, भावविवश 'सुमन' या स्त्री ची करुण कहाणी आहे. सुमन आपल्या मुलाला घेऊन प्रवास करत असताना लेखकाला आपल्या खडतर आयुष्याची कहाणी मनमोकळेपणाने सांगताना म्हणते, "नवरा हाय, समंद हायजी, बरीक गावातल्या बेकार लोकायच्यानादी लागून मुताडं प्यायला सिकला, अन् कुठबी गटारात मान खुपसून पडू लागला. मुताडं पेऊन रातच्या राता झोप येऊ देना गेला. शेतबाडी आणि घरात व्हतं नव्हतं तेवढं किडूक मिडूक ईकला. म्या त्येयला बकल इरोद केला जी, बरीक कुणाचबी ऐकना झाला. मले माहेरातून पिसा आनकी मनुं लागला. म्या कुठून आनणार जी?"[७] अशा प्रकारे तिच्यावर संशय घेऊन तिला घराबाहेर काढले जाते. एक निराधार, एकटी स्त्री असताना भरीत भर म्हणून तिच्यावर आणखी एक प्रसंग ओढवतो. त्या प्रसंगाचे वर्णन करीत असताना तिचा हुंदका दाटून येतो आणि ती म्हणते, "मह्या चुलता मंबईला हाये. म्हणूनशान तिकडं निघाले, बरीक टरकवाल्यानं ठेऊन घेऊन तीन-चार रातरा भोगलं...? आन पोटावर मारून टाकून दिलं"[८] असे सांगून ती आपले मन लेखकाजवळ मोकळे करते. तिची ती दर्दभरी कहाणी वाचताना मन सुन्न होऊन जाते.

## मृत्यूला आपलसं करणारी स्त्री :

'खेळ', 'मायचं सपान' आणि 'गायरान' या कथेत मृत्यूला आपलसं करणाऱ्या दलित वर्गातील स्त्रिया भेटतात. त्यामध्ये 'खेळ' या कथेतील सारजी ही डोंबारीन आहे.

डोंबारी ही जात-जमात बारा बलुतेदारापैकी एक होय. डोंबाऱ्याचा जीवघेणा खेळ हा सारजीवर पूर्णपणे अवलंबून असतो. सारजी ही आपल्या कुटुंबासाठी, मुलांसाठी खेळ करून दाखवत असते. पण नियती तिची परीक्षाच पाहते. कालपरवा जन्मलेल्या मुलाने लगेच दम सोडल्यामुळे दु:खामध्ये असलेली, ओली बाळंतीन असणारी सारजी आजारी अशक्त असल्यामुळे ती खेळ करण्यास असमर्थ असते. पण कोणतीही स्त्री ही आपल्या अस्तित्वापेक्षा आपल्या मुलांचे अस्तित्व, त्यांचा आनंद, त्यांचे निरोगी आयुष्य याला महत्त्व देते. त्यामुळेच सारजी आपल्या टी.बी.झालेल्या मुलाकडे पाहते आणि सर्व दु:ख विसरून डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे सहा हजार रूपयांची जुळणी करण्यासाठी खेळ करण्यास तयार होते. पण स्त्री असण्याच्या फायद्यापेक्षा गैरफायदेच जास्त असतात. सारजीला समाजातील दुष्ट चालीच्या लोकांच्या वागण्याबद्दल तिटकारा असल्यामुळे तिची एक मानसिकता तयार होते. आपण हे सर्व सोडून चांगले आयुष्य जगावे असे तिला वाटते त्याचे चित्रण लेखकाने पुढीलप्रमाणे केले आहे."गावोगावच्या लोकायच्या असल्या वागण्याला बघून सारजीला बी बक्कळ वाटायचं, पायातला घुंगराचा चाळ कायमचा फेकून द्यावा अन् मुंबई सारख्या शारवस्तीला जाऊन काय बी काम धंदा करून प्वाट भरावं."[९] पण जात-पंचायत, परंपरेचा, घराचा, मुलांबाळांचा विचार करून शेवटी डोंबाऱ्याचा जीवघेणा खेळ करून आपला जीव गमावते.

'मायचं सपान' या कथेतील सीताबाई पतीच्या मृत्यूनंतर आपल्या मुलाला घेऊन संसाराचा गाडा रेठते. दारिद्र्यावर मात करून आपल्या मुलाचे आयुष्य घडविण्याचा प्रयत्न करते. आपल्या मुलाने मोठे व्हावे असे तिला वाटते. आपल्या मुलावर जीवापाड प्रेम करणारी आई स्वत: गरीबीत राहून पैसा-पैसा गोळा करून आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी पैसे देते कारण तिचे एक स्वप्न असते. सीताबाई आपल्या गणपत या मुलाला म्हणते, "बापू गणपत, तू शिकूनशान आंबेडकर बाबासाहेबांवाणी बॅरिस्टर व्हय! ह्या मायचं सपान पुरं कर! तु शिकूनशान मोठा व्हय बापाच्या माघारी माझ्या जनमाचं सार्थक कर."[१०] अशा प्रकारे आपल्या मुलाच्या बाबतीत उराशी स्वप्न बाळगून वाटचाल करणारी सीताबाई जेव्हा आपला मुलगा

आपले स्वप्न पूर्ण करीत नाही हे जेव्हा तिच्या लक्षात येते तेव्हा ती मृत्यूला आपलसं करते.

'गायरान' या कथेतील पारूबाई ही दलित समाजातील स्त्री आहे. सदाशिवराव पाटलाच्या शेतात निंदण करून जगणारी स्वाभिमानी स्त्री आहे. आपल्या मुलाने लोकांची चाकरी करण्यापेक्षा त्याने शिक्षण घ्यावे असे ती आपल्या पतीला धोंडीबाला सांगताना पारूबाई डोळ्यात पाणी आणून म्हणते की, "आपलपोटी लोक हायतं. माझं पाटील म्हणून उभा जल्म त्येंच्या शेतात घातला. परिक त्येयला आपली दया आली न्हाय माय? आवं, येळ परसंगाला ते स्वत:च्या बायकोलाबी दगा देत्यात आवं, म्हणून म्या म्हणते, आपल्या पिच्याला कसंबी करून साळत घालाव...?"[११] पतीही तिला साथ देतो. पारूबाई ही आपल्या कामाची आवरा-आवर करून मुलाचे शाळेत नाव घालून ती पतीसाठी गायरान माळाकडे भाकरी घेऊन जाते आणि तेथे आपल्या रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पतीला बघताच मोठ्याने ओरडते आणि खाली कोसळते ते कधीच न उठण्यासाठी.

## शारीरिक सुखासाठी आसुसलेले मन :

'मालकीनबाय' या कथेत पांढरपेशा वर्गातील शुभांगी या स्त्रीची एक प्रकारची मानसिक अवस्था प्रभाविपणे चितारलेली आहे. शुभांगी ही गंगाधर पाटील याची एकुलती एक मुलगी. मॅट्रिक पास झाल्यानंतर तिचा विवाह झालेला असतो. परंतु शारीरिक भूकेची पूर्तता करून घेण्यासाठी, आपल्या पतीकडे पुरूषत्त्व नसल्यामुळे ती आपला घरगडी सदाशिव याच्याकडून शरीरसुख मिळविण्यासाठी प्रयत्न करते. सदाशिव जेव्हा वाड्यात येतो तेव्हा तिच्या मनात अनेक विचार घर करू लागतात. "लग्नापूर्वी न भेटलेला सदा आज पप्पा नसताना वाड्यात एकटा दिसतोय? पण हाच सदा लग्नाअगोदर एकटा भेटला असता तर...?"[१२] शारीरिक भुकेने कोडलेले आतल्याआत धुमसणारे तिचे मन नैतिकतेचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करते. शुभांगी शेवटी काकुळतीला येऊन सदाशिवला म्हणते, "सदाशिव, तू माझ्या मनाचा ईचार करणार नाहीस ना? आरे, मी लग्नामुळे सुखावले. परंतु श्रीमंती ही स्त्रीच्या भावना रिझवू शकत नाही रे...? तिला पाहिजे तिचे मानसिक सुख. नेमकं तेच त्या ठिकाणी नाही, सदाशिव? माझ्या पतीजवळ पुरूषार्थ नाही रे...? सदा, अजून मी कुमारिका आहे रे?

तुच सांग सदाशिव, मी काय करू ? या तहाणलेल्या हारणीची तहाण भागव! तू तहाण भागवसिल अशी माझी अपेक्षा आहे. अरे सदासिव, तू जर नकार दिल्यास तर मी माझ्या जीवाचं...?"[१३] असे म्हणून शुभांगी सदाशिवला पकडण्याचा प्रयत्न करते. तिच्या मनात व्यभिचाराची भावना निर्माण होते. अशाप्रकारे शुभांगीच्या मानस अवस्थेचे एक वेगळेच रूप चित्रित केले आहे.

## स्वाभिमानी स्त्री :

'ईरवाड', गोंदण आणि शीर्षक कथा 'भूकबळी' या तीन कथांचा समग्रपणे विचार करता त्यामध्ये एक स्वाभिमानी स्त्री भेटते. भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरूष समानता या मूल्यांची देणगी देऊ केली आहे. राजकारणासारख्या क्षेत्रात स्त्रियांना राखीव जागा ही देऊ केल्या आहेत. 'ईरवाड' या कथेत राजकारणासारखाा ज्वलंत विषय हाताळला आहे. या कथेतील 'धुराबाई' स्त्री पात्र प्रभावशाली वाटते. निवडणूकीसाठी दलित समाजातील स्त्रियांना वार्डातून उभे राहण्यासाठी सरकारने काही राखीव जागा दिलेल्या असल्याने 'धुराबाई' सरपंचकीच्या निवडणूकीला उभी राहते. पण कल्याणराव पाटील सभेमध्ये धुराला सरपंचकीच्या भानगडीत पडू नये असे सांगतो तेंव्हा शांत बसलेली धुरा उठून म्हणते, "पाटील, देशात निवडणूक लोकशाही पद्धतीने होत आहे. ती कोणालाही लढवण्याचा अधिकार स्वतंत्र भारतातील प्रत्येक नागरिकास आहे. त्यामुळे ही निवडणूक मी लढविणार आहे."[१४] अशा प्रकारे कल्याणराव पाटलाला आव्हाण देणारी धुरा निवडून येते. ती शिकलेली असल्यामुळे तिची स्वत:ची अशी एक विचारसरणी होती. त्याबद्दल लेखकाने पुढीलप्रमाणे चित्रण केले आहे, "धुरा शिकलीसवरलेली पोरगी. तिच्याजवळ विचारांच भांडवल व्हतं. एखाद्या गोष्टीवर विचार करण्यापुरती बुद्धी तिच्याजवळ व्हती. तिचं मन म्हणत व्हंत, 'हजारो वर्षापासून वंचित असलेल्या समाजाला डॉ.बाबासाहेबांनी हक्क दिले आहेत. अधिकार मिळवून दिले आहेत. त्यांच्या घटनेतील कायद्यामुळे दुर्बल घटकांना निवडणूकीत भाग घेता येऊ लागला. आता कोठे महात्म्याच्या कार्यास मूर्तस्वरूप येत आहे."[१५] जेव्हा ती दलित नेत्याच्या दुष्ट प्रवृत्तीला, अनपेक्षित परिस्थितीला बळी पडते. तेव्हा तिला राजकारणातील

गलिच्छ वातावरणाचा अनुभव येतो आणि त्या परिस्थितीवर, संकटावर निर्भयपणे मात करते. 'गोंदण' या कथेतील 'हन्नी' ही व्यक्ती काळजाचा ठाव घेते. हन्नी उर्फ रानी ही कल्याणराव पाटलाची मुलगी पंढरपूरच्या यात्रेत हरविलेली असते. त्यामुळेच तिच्या हातावर जे गोंदण काढलेले असते त्यावरून फौजदार सर्जेराव पाटील तिला ओळखतो. पण वेश्या व्यवसाय करणारी हन्नी जेव्हा आपण केलेल्या रावसाहेबाच्या खुनाची कबुली देताना ती म्हणते, "साहेब, ज्याने माझ्या सारख्या निरागम बालकांना फूस लावून पळविले. त्यांना मोठे करून हुंगलं अन् या कुजक्या धंद्यास जीवण व्यथीत करायला लावलं कित्येक स्त्रीयांचे जीवन उध्वस्त केलं, तरीही प्रतिष्ठेचा बुरखा पांघरून समाजात फिरणाऱ्या नराधमाचा खून नाही होणार ? तर काय होणार साहेब ? त्या पाप्याचा खून मी केला आहे. मी खून का केला ते ऐकायच तुम्हाला ?"[१६] असे म्हणून ती पुन्हा आपली कहानी सांगू लागली, "साहेब, ज्यांनी मला रखेल म्हणून बंगल्यात ठेवलं. अन् मी गरोदर आहे हे लक्षात येताच अंगावर तेजाब ओतून जीवंत मारण्याचा प्रयत्न केला. तुम्हाला बघायचे आहे.?"[१७] असे म्हणून ती स्वत:ची जळकी छाती दाखवते. शेवटी तिने मांडलेले विचार वाचकाला सुन्न करून सोडते. हे विचार सांगताना ती म्हणते, "अण्णा ऽ कपड्याला लागलेला डाग साबणाच्या वडीने धुता येईल रे? पण माणसाच्या ईभ्रतीला लागलेला डाग कसे बरा धुता येईल ? इतकं तर माहित आहे ना? इज्जत कमावण अवघड असतं, पण ती मातीमोल करण सोपं असतं माझी तुला शपथ आहे. माझ्या आई वडिलांना काहीही सांगू नकोस ?"[१८] असे म्हणून ती साईनाईड घेऊन आपली जीवनयात्रा संपवते. 'भूकबळी' या शीर्षक कथेतील 'सोदरी' ही निष्पाप निरागस, स्वत:पेक्षा आपल्या पतीला, मुलांना महत्त्व देणारी स्त्री. 'सोदरी' या पात्राचे लेखकाने केलेले चित्रण अतिशय हृदयस्पर्शी व संवेदनशील वाटते.

फासेपारधी ही जमात वर्षानुवर्ष गुन्हेगारी म्हणूनच समाजामध्ये गणली जाते. सोदरी ही भिकऱ्या फासेपारधी याची पत्नी आपल्या दोन मुलांना घेऊन झोपली असताना ती साखर झोपेत असताना पोलीस तिच्या पालात येतो आणि तिच्या केसांना हिसडा देऊन "उठ रांड ? छिनाल कुठली की ? रांडची आजून झोप गेली नाही वाटतं ?"[१९] असे म्हणून तिला तो

उठवतो. उठताक्षणी ती त्या फौजदाराच्या वाईट नजरेला बळी पडते. व तिच्यावर पाशवी बलात्कार होतो. पण त्यातूनही ती प्रतिकार करण्याचा प्रयत्न करते. जेव्हा ती संतप्त होते तेव्हा मात्र सोदरी मधील स्त्री स्वाभिमान जागा होतो. आणि ती कोयता घेऊन फौजदारावर वार करते आणि म्हणते, "मर मेल्या मुडद्या लैय फुकटाची खाऊन माज आला व्हाय रं...तुला? आरं बोल की रं ये ऽ फौजदारा ? गरीबाची आब्रु म्हणजी रस्त्यावर पडली व्हयं रं...? आरं , ती काय तुमच्या घरचं पोतरं, झाडतन हाय व्हय रं...? आरं ये ऽ फौजदारा, तुला कोणी माय बहिण हायत का न्हाय रं...?"[२०]

## पांढरपेशा वर्गातील बेगडी प्रतिष्ठा :

'सौदा' या कथेमध्ये रूढी, परंपरा, घराची बेगडी प्रतिष्ठा, खानदान या सर्वांना बळी पडलेली स्त्री 'कुसुम' भेटते. कुसुम ही सुशिक्षित मानसशास्त्राची पदवीधर पण मुकपणे अन्याय सोसणारी, कोणताही प्रतिकार न करणारी अशी ही कुसुम कॉलेजमध्ये असताना वसंताच्या प्रेमात पडते. पण जातिभेदामुळे त्यांना लग्न करता येत नाही. म्हणून शेवटी तिला दारूड्या पतीबरोबर संसार थाटावा लागतो. पण सासरी गेलेली कुसुम जळल्यामुळे खुप भाजली जाते आणि त्यातच तिला जग सोडावे लागते. तिच्या अंत्यविधीहून सर्वजन घरी परतल्यानंतर रात्री कुसुम वसंताच्या स्वप्नात येते आणि आपल्यावर झालेल्या अन्यायाची दर्दभरी कहाणी सांगताना म्हणते, "वसंता, माझ्या पपांनी माझा सौदा केला आहे रे? आरे, मी का नाही, ते घर-दार, रिती-रिवाज, अन् जात-पात, धर्म पुरं सोडून कायमची तुझ्याकडे कायमचं घर बसवण्यासाठी अशा घेऊन आलेय. माझी तुझ्यासोबत संसार करण्याची तिव्र विच्छा आहे. तू माझा पत्नी म्हणून स्विकार करशील... करशील कारे, वसंता ?"[२१]

## अंधश्रद्धेचा गैरफायदा घेणारी स्त्री :

'देवकामायचं श्याडं' या कथेतील देवकामाय ही स्त्री म्हणजे समाजाला घातक ठरणारा घटक असल्याचे दिसून येते. अंधश्रद्धेसारख्या निरर्थक व्यवस्थेला बळी पडलेल्या अडाणी, भोळ्या लोकांची फसवणूक करून त्यांना लुबाडून आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करते.देवकामाय ही देवकरीण असल्यामुळे अंगात आल्याचे नाटक करूण लोकांना


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

लुबाडण्याचा व्यवसाय म्हणून देवपण करणे हा व्यवसाय तिने निवडला होता. सुरूवातीच्या काळात ती आपल्या पतीबरोबर सिकींद्राबादला विटा करायच्या कामाला जायची. पण ते काम सोडून तिने हा व्यवसाय निवडला होता. त्यामुळे ती अनेक भानगडी करून नावारूपाला आली होती. ती दिसायला विचित्र होती. तिचे वर्णन लेखकाने पुढीलप्रमाणे केलेले आहे, "उंचीला पाच सव्वापाच फूट असणारी देवकमाय दिसायला जाडजूड झाडाच्या बुंध्यावाणी व्हती. देवकाला घरी बसून सुख मानवल्याने तिला धंड सुटलं व्हतं. देवका दारातल्या बळदावाणी दिसत व्हती. परंतु तिचं तोंड मात्र वटकीवाणी व्हतं तिचा एक-एक ओठ रांजणाच्या कठासारखा व्हता. तिला लोक वावऱ्या ओठाची म्हणाचे. तिच्या तोंडातील खालच्या फाक्याचे वाकसावाणी दोन दांत पडले व्हते, तर वरच्या फाक्याचे वाकसावाणी दोन दांत म्होरं आले व्हते. देवकामाय देवकरीन ज्या दिवसी झाली. त्या दिवसापास्नं तिनं नागिलीचं पान बी खायला सिकली व्हती. अन् तिच्या एका डोळ्यात गुड्स वाढलं व्हतं. त्यामुळे देवकामाय लई इद्रुप आणि कुरूप दिसाल्ती. तरीबी आज देवकाने हिरवं-लुगडं, चोळी नेसल्ती अन् त्या लुगड्यावर कंबरपट्टा चढविला व्हता. त्या कंबरपट्ट्याच्या वरती भंडाराचा भला मोठा बटवा कंबळाच्या बाजूला खुपसला व्हता. तिनं डोस्क्याचे केस मोकळे सोडून हातात लिंबाचा ढाळा घेतली व्हती."[२२] गावातील अनेक लोकांची कोडी देवकामाय सोडवत असल्यामुळे व तिच्या अंगात देवी येत असल्यामुळे मध्यरात्रीपर्यंत गावातील लहान-मोठ्यापर्यंतचे लोक तिच्याकडे येत असत. एकदा एक माणूस देवकामाय कडे नारळ-उदबत्ती घेऊन आपले कोडे सोडविण्यासाठी येतो. देवकामाय ही कोडे घालविण्यासाठी आपला स्वार्थ साधून घेण्यासाठी म्हणते की, तुला सात आसराने धरलेले आहे. त्यावर उपाय म्हणून "तुला त्यासाठी व्हय तुला... त्यासाठी, धुरपतमायच्या गळ्यात हजार रूपायची माळ घालावं लागलं आन पहिलारू शेळीची पाठरू सोडव लागलं. मग तुझ्या अंगातल्या सात आसरा जातील?"[२३] अशाप्रकारे गावाला लुबाडणारी देवकामायचं पितळ गावातील काही सुशिक्षित असणाऱ्या सामाजिक कार्य कर्त्यांकडून उघडे पाडले जाते. तेव्हा ती ओरडूण म्हणते, "माझी माय तुम्हाला बघून घेईल ? तुमचा सत्यानाश करील? तुमच्यावर कोप होईल ? तुमचं भोईबरूबर होईल?"[२४] जेव्हा गावातील

लोकांपुढे तिचा काळाधंदा उघडकीस येतो तेव्हा ती आजपासून लोकांना लुबाडण्याचा धंदा बंद करण्याचे आश्वासन देते. ही व्यक्तिरेखा विनोदी अंगाने वाटचाल करताना दिसते.

## कुटुंबनियोजन विषयक स्त्री दृष्टिकोन :

भारतात लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. सतत वाढत जाणारी लोकसंख्या ही देशापुढे मोठी समस्या बनली आहे. ती समस्या सोडविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतलेले दिसून येतात. 'ऑपरेशन' या कथेत कुटुंबनियोजनासारखा विषय हाताळला गेला असून 'सगूनबाय' या स्त्री व्यक्तिरेखेभोवती हे कथानक वावरताना दिसते. सगूनाबाय ही अडाणी, अशिक्षित अशी स्त्री असल्यामुळे आपल्या स्वार्थ साधून घेण्यासाठी नामा मास्तर सगूनाबायला ऑपरेशन करायला सांगतो. पण शेजारच्या बायकांनी सगूनाला ऑपरेशनची भिती घातलेली असल्याने ती ऑपरेशनला तयार होत नसते. पण नामा मास्तर तिला आपल्या परीने ऑपरेशनचे महत्त्व सांगतो. त्याचबरोबर विवाह होऊन सासरी गेलेली तिची मुलगी कौशल्या ही आपल्या आईला ऑपरेशनचे महत्त्व सांगताना म्हणते, "पोटच्या लेकरायला मुलंबाळं व्हायला लागली की, मायला लेकरूबाळ होऊ नये असं जग म्हणतंय! तू कायबी करून आपरेसन केलेलं बरं ग... माय?"[२५] असे सांगून ती आपल्या आईला ऑपरेशनचे महत्त्व पटवून देते. त्याप्रमाणे सगूनाबाय ऑपरेशनला तयार होते. पण जेव्हा ऑपरेशन अयशस्वी होते. तेव्हा मात्र ती दुसऱ्यांदा ऑपरेशनची वेळ येणार या कल्पनेने ती लहान मुलासारखी रडते. 'सगूनाबाय' या व्यक्तिपात्रामुळे ही कथा विनोदी वाटते.

## सासू-सुन संबंध :

'म्होतर' या कथेतील गजराबाई व मंजुळा या स्त्री व्यक्तिरेखा विनोदी असल्याने विलक्षण नजरेत भरतात. आपल्या मुलाचा दौलूचा संसार टिकू न देणारी व तीनंदा संसार मोडणारी गजराबाई ही वेगळ्या स्वभावाची व्यक्तिरेखा आहे. गजराबाई ही दौलू व मंजुळा या पती-पत्नीला कधीही एकत्र येऊ देत नसे. त्यामुळे दौल्याची पत्नी मंजुळा व तिची सासू यांच्यात शुल्लक कारणावरुन सतत भांडणे होत असे. ती मंजुळाला मारत ही असे. त्यामुळे मंजुळाचा वडील गावातील चार-पाच पंचाना बोलावून आणतो. पंच जेव्हा

गजराबाईला भांडणाचे कारण विचारतात तेव्हा ती म्हणते, “मंजुळी केसाला पिना लावते... केसाचा फुगा पाडते... अन् फडक्याच्या आतनं चेडीबी लेकवतीया बघा. माझ लेकरु लय साधभोळ... त्याच्या नशीबी ही बावकलिंगी आली वं...मा ऽ य?”[२६] गजराबाई इजोट बाई असल्यामुळे ती नाटकी सुरात, डोळ्यात पाणी आणून ती आपले म्हणने खरे आहे अशा अविर्भावात ती खोटे बोलते हे ऐकताच मंजुळाही आपले तोंड उघडते आणि म्हणते, “आबा, त्या कायबी सांगत्यात. आत्या बायचं आमाला एक होऊ देत न्हाईत. त्या रोज कायतर नवीन भानगड काढून रातभर चेती बसत्यात. आम्हाला झोपी जावू देत नाहीत, अन् रात्री तर त्यांनी चक्कं आमच्याजवळ बाजूला बाज लावून झोपल्या. नांदायला आल्या पास्नं माझ्याशी असच वागत्यात. मला रोज मारत्यात. आबा ऽ म्या तुमच्या इंथ शेण-निदंण न्हायतर कायबी करून जगेन. बरीक या घरी माझ नांदणूक लागत न्हाय.”[२७] अशा प्रकारे या दोन भिन्न प्रवृत्तीच्या या दोन स्त्रियांचे भावविश्व लेखकाने चित्रित करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

‘भूकबळी’ या कथासंग्रहामधील काही कथांमध्ये गौण स्त्री पात्र दिसून येतात म्हणजेच त्या कथेच्या विकासामध्ये त्या तितक्याशा प्रभावशाली दिसून येत नाहीत. त्यामध्ये ‘तमाशा’ या कथेतील सुनंदा पाटील ही व्यक्तिरेखा तितकीशी उठावदारपणे दिसून येत नाही. तमाशा करुन कलेच्या क्षेत्रात नावलौकिक मिळविणारी, लग्नाची स्वप्ने पाहणारी, जाती-धर्माचे बंधन जुगारून देणाऱ्या साहेबराव देशमुख या तरूणावर प्रेम करणारी व आपले सर्वस्व साहेबरावाला बहाल करणारी सुनंदा ही स्त्री दिसते. तर ‘मायचं सपान’ या कथेतील मनिषा देशपांडे ही गणपतला आपल्या मृगजाळात अडकविते पण नंतर गणपत हा अस्पृश्य जातीतील आहे हे समजल्यानंतर ती म्हणते, “मूर्खा ऽ माझ्या समोरनं चालता हो ऽ ? मी गरीब आहे, असं पहिलच का नाही सांगितलस मला! मी तर... आणि तू मात्र भिकारी निघालास ?”[२८] अशा प्रकारे स्पृश्य-अस्पृश्य भेद मानणारी मनिषा गणपतचे निस्वार्थी प्रेम नाकारते. त्याचप्रमाणे ‘मालकीनबाय’ या कथेतील हारणाबाई व द्वारकाबाई हे पात्र इतर पात्रांना सहाय्य म्हणून आलेली दिसून येतात.

## पुरुषसत्ताक संस्कृतीचे वर्णन :

विलास सिंदगीकरांनी आपल्या कथासंग्रहाच्या माध्यमातून प्रत्येक कथेतून पात्रांच्या बाह्यवर्णनापेक्षा मानसिक स्थितीचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्या पात्रांच्या मनातील द्वंद ते प्रभावीपणे चित्रित करतात. पुरुष व्यक्तिरेखेचे चित्रण करीत असताना सुशिक्षित दलित तरुण, राजकारणी, संसारी माणसे, विविध स्तरातील वयोगटातील पात्रे येताना दिसतात. सिंदगीकरांनी कथांच्या माध्यमातून स्त्रियांच्या अनेक पदरी सुख दु:खाचा वेध घेतलेला आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कथेतील पुरुषही अडचणीत सापडताना, परिस्थितीपुढे हतबल होताना दिसतो. अशा व्यक्तिरेखांचा आढावा पुढीलप्रमाणे घेतलेला आहे.

## बेरकी प्रवृत्तीच्या व्यक्ती :

जिल्हा परिषद शाळेचे हेडमास्तर नामा मास्तर हे 'ऑपरेशन' या कथेतील बेरकी, स्वार्थी व्यक्ती आहे. नियमानुसार शिक्षण विस्तार अधिकारी साहेबांनी नामा मास्तरला ऑपरेशनच्या पाच केसेस आणल्याशिवाय पगार मिळणार नाही असे सांगितलेले असते. त्यामुळे त्याने आत्तापर्यंत कशातरी कुटुंबनियोजन ऑपरेशनच्या चार केसेस मिळविलेल्या असतात आणि पाचवी केस मिळविण्यासाठी तो धडपडत असतो. त्याचवेळी संतुकराव व त्याची पत्नी त्याच्या तावडीत सापडतात आणि तो यशस्वीरित्या कुटुंबनियोजनाचे महत्त्व सांगून तो ती केस मिळवतो आणि आता आपला पगार वाढ होणार या कल्पनेने आपला स्वार्थी हेतू साध्य झाला म्हणून तो आनंद व्यक्त करतो. 'म्होतर' या विनोदी कथेतील दौलू हे पात्र विलक्षण प्रवृत्तीचे असल्याचे दिसून येते. बाईल वेडा असणारा दौलू आपल्या आईच सर्व काही ऐकत असतो. त्यामुळेच तिच्या सांगण्यावरुन त्याने आपले तीन संसार मोडकळीस आणलेले असतात. त्यामुळे गावातील काही निवडक लोक या आई-मुलाला धडा शिकविण्याचे ठरवितात. गावातील पाखऱ्या भाऊ हा बेरकी माणूस असतो. त्याने मरीबाच्या सहाय्याने दौल्याला व त्याच्या आईला गजराबाईला चांगला धडा शिकविण्यासाठी लग्नाचा म्होतर ही योजना आखतात आणि ही योजना यशस्वी होते. पण योजनेनुसार बायको वेषातला मरीबा

जेव्हा पळून जाण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा दौलू स्वत:ची बायको पळून जात आहे असे समजून तो त्या स्त्री वेषातल्या मरीबाला पकडतो. तेव्हा मरीबाच्या तोंडून निघालेले उद्‌गार हास्यास्पद वाटतात ते असे, "म्या काय तुला बाय दिसतो व्हयं रं... ये ऽ हरामखोरा ऽऽ! आरं, तुम्ही दोघं मायलेकर किती बायललेकींच्या संसाराचं वाटोळ करच्यालरं...? "[२९] असे म्हणून मरीबा दौल्याला मारतो आणि ताकित करताना म्हणतो, "दौल्या, ओरडलास तर याद राख साल्या ऽ ? तुला या बेसरमात मारून फेकून देईन हारामखोरा ऽ ? अनीक हे बघ आता गुमान घरी जा उद्याला तुझ्या घरी मंजुळीला नांदायला घेवून ये. आरं दौल्या तू काय मर्द हाई स का बाय हाईस"[३०] असे म्हणून मरीबा निघून जातो. दौलूला आपली चूक समजते.

## धाडसी प्रवृत्तीचे चित्रण :

'इज्जत' या कथेतील शिवाजी मोरे हा दहा-अकरा वर्षाचा मुलगा आपल्या चतुराईने, हुशारीने, चलाखीने गावातील मरीबा गोसावी, धोंडुदा बडवे, बाल्या पोटगे या वाईट प्रवृत्तीच्या लोकांचे पितळ गावासमोर उघडे करताना दिसतो. सोने मिळविण्यासाठी अंधश्रद्धेवर, भुताखेतावर विश्वास ठेऊन लालसी प्रवृत्तीने निष्पाप निरागस शिवज्या व रावण पाटलाची इज्जत असणारी पिंकीराणी या दोन निष्पाप मुलांना बळी देण्याचा प्रयत्न मरीबा गोसावी, धोंडुदा बडवे, बाल्या पोटगे करतात. त्यांचा हा डाव लहानगा शिवज्या उधळून लावतो. पण जेव्हा मरीबा गोसाव्याला पोलिस पकडून नेतात तेव्हा तो शिवाजी मोरेला म्हणतो, "येवढं वय झालं, आतापस्तूर म्या लोकवांना फसविल पर पोरा, तू मला सबक शिकवीलास. आमचा रस्ता आमाला दाखवलास. या काळ्या मायचा पांग, फेडण्यासारखा नक्कीच मोठा व्हशील ? माझ्या डोळ्यातील धुंद उतरवलीस पोरा ?"[३१] रावण पाटलाला आपली मुलगी सुखरूप मिळाल्यामुळे त्याला भरभरून येते आणि शिवाजी मोरेच्या पाठीवर हात ठेवून म्हणतो, "वीर फकिरा सारखा मोठा शूर हो? आतापर्यंत तुम्ही आमची इज्जत जपली, आन् पुन्हा न्न"![३२]

## परिस्थितीमुळे हतबल, दु:खी झालेली व्यक्ती :

'खेळ' या कथेतील धर्म्या डोंबारी ही व्यक्ती हृदयस्पर्शी वाटते. परंपरेने चालत

आलेला डोंबाऱ्याचा खेळ करणारा धर्म्या एका गावाहून दुसऱ्या गावामध्ये स्थलातंर करून सुगीच्या दिवसात मागूण खाणारा व आपले कुटुंब सांभाळणारा असा जबाबदार वृत्तीचा दिसतो. वास्तविक डोंबाऱ्याचा खेळ हा धर्म्याच्या पत्नीवर अवलंबून असतो. पण ओली बाळंतीण असणारी सारजी अशक्त असल्याने ती तो खेळ करण्यास असमर्थ असते. पण सारजीच्या भावनेला किंमत न देता धर्म्या म्हणतो, "मग लेकराच्या गळ्यात धोंडा बांधून हिरीत नेवून टाक?"[३३] असे तो त्रागाने म्हणतो आणि लगेच आपला सूर बदलून तिला समजविण्याच्या हेतूने म्हणतो, "आगो बाई, तू नको नाचू...? फकस्त तू पायात चाळ बांधून चौकात उभी ऱ्हाय! माझं म्या चंपीला घेऊन खेळ दाखवतो."[३४] असे म्हणून तो आपल्या पत्नीला खेळासाठी तयार करतो. पण जेव्हा सारजी खेळ करून दाखविताना अचानक खाली पडते आणि जग सोडून जाते तेव्हा मात्र महाराष्ट्रात डोंबारी खेळासाठी प्रसिद्ध बहादूर असणारा धर्म्या मात्र हतबल दु:खी होतो.

## राजकीय जीवनातील भ्रष्ट व्यवहाराचे चित्रण करणारी व्यक्ती :

कल्याणराव पाटील ही 'ईरवाड' या कथेतील बेरकी व्यक्तिरेखा. राजकारणासारख्या विषयातील सगळे डावपेच माहिती असलेला पाटील जेव्हा गावकीच्या सरपंचकीच्या निवडणूकीत सरपंचकीची सीट महार-मांग या दलित वर्गातील स्त्री ला देऊ केली आहे हे समजताच तो अस्वस्थ होतो. पण तरीही गावचा कारभार आपणच करणारा म्हणून तो देवकाच्या घरी जाऊन तिच्या मनातल काढून घेतो. त्यावर नामदेवराव डोले कल्याणराव पाटलाला म्हणतो, "आहो पाटील, नाव देवकाबायचं आन् गाव व्हणार मातर कल्याणराव पाटलाचं! समद्या येजना तुमी करणार आन् आंगुठा देवकाबाय लावणार ? गावात हे काम मातर अक्षी बराबर चालणार बघा."[३५] कल्याणराव पाटलाला पराभव माहित नसला तरी यावेळेस मात्र त्याला पराभव पत्कारावा लागणार असे चिन्ह दिसून येत होते. त्यामुळेच लोकमत परिवर्तन करण्यासाठी तो मागासवर्गीय लोकांची शाहू महाराज समाज मंदिरात बैठक बोलवितो आणि बैठकीत आपले मत व्यक्त करताना म्हणतो, "लोक हो, आजपस्तूर म्या गावची सरपंचकी संभाळली पुरा गाव नीट चालविला तसं मागच्यावाणी म्होरंबी हा गाव

गुण्यागोविंदानं चालू रहावा, म्हणून ही मिटींग बोलावली आहे."[३६] अशा प्रकारे भाषणातून अप्रत्यक्षपणे मला निवडूण द्या असे म्हणतो आणि त्याच्या विरूद्ध उभा राहिलेल्या धुराबायला माघार घ्यायला सांगताना म्हणतो, "धुरा ऽ सापाबरोबर वैर करण बरं नाय बघ म्या डोम्या नाग हाय... नाग! म्या उगच चावत नसतो. याचं भान ठीव म्या एकदा डूक धरलेल्या माणसाला सहजासहजी सोडत नसतो. म्या इंगोळ हाय ते तुला ठाव नाय? तू गावात कालपरवा आलेली पोर हायेस, चार बुकं शिकलेला माणूस आकलवान आसतच असं नाय ? लोक हो..."[३७] असे म्हणणाऱ्या कल्याणराव पाटलाचा पुरुषी अहंकार धुरामुळे नाहीसा होतो. तेव्हा तो धुराशी माफी मागतो.

## अन्यायाविरूद्ध लढा देणाऱ्या व्यक्ती :

भूकेसारखा न सुटणारा गंभीर प्रश्न घेऊन 'भूकबळी' या कथेत भिकन्या वावरताना दिसतो. त्याचे केलेले चित्रण हे हृदयाचा ठाव घेणारे दिसून येते. फासेपारधी समाजातील भिकन्या आपल्या कुटुंबासह राहत असतो. भिकन्या जेव्हा गावात येतो तेव्हा लेखकाने त्याचे केलेले वर्णन असे, "अंगापिडांन धिप्पाड आसलेल्या भिकन्या फासिपारध्याच्या मिशात तिखटपणा जाणवत व्हता. भिकन्या गावात आला म्हणतानी दहा-बारा गावच्या पाटील पांड्यावाणी डुलत यायचा. त्याला बघताच भ्याव वाटावं"[३८] चोरी करण्यात हुशार, चपळ असणाऱ्या भिकन्याबद्दल लेखक म्हणतात, "आख्या मुलखात भिकन्या फासिपारदी अट्टल चोर हाय म्हणून वळखीचा भिकन्या डोळ्याचं पतन पडूजेकना कुणाचीबी चोरी करून लंपास व्हायचा. झोपल्या जागून एखाद्या बाईला डोळ्याचं काजळ काढून आण म्हन्लं तर भिकन्या त्या बाईला थांग पत्ता लागू न देता काजळ काढून आणायचा."[३९] भिकन्या सुगीच्या दिवसात लोकांच्या शेतातील चोरी करुन सात-आठ मन ज्वारी देवबा पाटलाकडे आणून ठेवत असे असा क्रम प्रत्येक वर्षी चाले. पण देवबा पाटलाची स्वार्थी भावना उफाळून येते आणि भिकन्या ने आणून ठेवलेली ज्वारी तो गावातील गोर-गरीबांना व्याजाने देवून टाकतो. त्यामुळे भिकन्याने पाटलाकडे ठेवलेली ज्वारी पाटील देण्यास नकार देतो. तेव्हा हताश होऊन भिकन्या आपल्या मुलांवर उपासमारीची वेळ येऊ नये म्हणून तो पाटलाला विनविण्या करतो

आणि म्हणतो, “मह्या पालात चिमणीला घालीन म्हणता एकूबी जवारीचा दाना न्हाय मालक ऽऽ! पाय धरतो म्या तुपलं. बरीक या वकताला वापिस करू नका?”[४०] पण स्वार्थी देवबा पाटील त्याचे काहीही न ऐकता त्याचा अपमान करतो. तेव्हा मात्र भिकन्या चोरीचा विचार करुन तो आपल्या पत्नीला म्हणतो, “ये ऽ सोदरी, म्या त्या देवबा पाटलाच्या इंथ जात हाव. म्या, त्या पाटलाच्या हिथली दाणं नाय अनालु तर त्याचं कायबी वाटोळं करुन ईनार हाय ?”[४१] असे म्हणून तो रात्रीच्या वेळी अनेक अडचणीतून भिकन्या नदी पार करतो आणि बुरूजावरुन वाड्यात उतरतो. पत्नीला सांगितल्याप्रमाणे तो ज्वारीचे दाणे धोतराच्या धडप्यात बांधतो आणि ते गाठोड खाली सोडून बुरूजावरून खाली येण्याचा प्रयत्न करतो. पण नियतीच्या मनात काही वेगळेच चक्र चाललेले असल्यामुळे अचानक रात्रीच्या त्याच क्षणी देवबा पाटीलाकडून बुरूजाच्या दिशेने बंदुकीचा चाफ ओढला जातो आणि त्याच क्षणी भिकन्याला आपला जीव गमवावा लागतो. ‘गायरान’ ही कथा काल्पनिक असली तरी वास्तव जीवनाची फुसटशी जाणीव करुन देते. तालुक्याहून जेव्हा बातमी येते की, ज्या मालकाच्या पन्नास-शंभर एकर जमिनी आहेत आणि जे दलित लोक बापदाद्यापासून मालकाची जमीन कसतात. ज्या शेतामध्ये कष्ट करतात. त्या लोकांना पाच एकर जमीन मिळणार आहे. या बातमीने धोंडीबाला खूप आनंद होतो. पण बेरकी सदाशिव पाटील मात्र गायरानची जमीन देतो असे खोटे आश्वासन देतो. या आश्वासनाला धोंडीबा बळी पडून ती जमीन टिकावाने नांगरतो पण अचानक जेव्हा मालक त्या गायरान जमिनीचा तुकडा सोडायला सांगतो तेव्हा मात्र निराश होऊन धोंडीबा पाटलाचा पाया पडतो पण स्वार्थी पाटलाला त्याची दया येत नाही. जिद्दीला पेटलेला धोंडीबा गायरान माळ सोडायला तयार होत नाही. तेव्हा मात्र पाटील धोंडीबाच्या कमरेत लाथ मारुन कुऱ्हाडीचा धाक दाखवतो. या अन्यायाविरूद्ध धोंडीबा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करतो. पण लांडग्या प्रवृत्तीचा सदाशिव पाटील कुऱ्हाडीच्या सहाय्याने धोंडीबाच्या अंगावर वार करतो. धोंडीबा जेव्हा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा मात्र तो अयशस्वी होऊन खाली पडतो. तेव्हा त्याने काढलेले उद्‌गार मन सुन्न करुन जाते, “मालक ऽ लय वाईट वागलं बघा लहानपणा पास्नं म्या तुमच्या शेतात राबल्याची परतफेड केली बघा या

तुमच्या उपकाराची परतफेड म्या एका टिकावाच्या दणक्यात फेडीन. पण... न्हाय ऽ पाटील, म्या लहान पणापास्नं तुमचं मीठ खाल्लावं ? पाटील साहेब, आताही मनात आणीन तर एका टिकावाच्या दणक्यात जमीनीत गाडायची ताकद हाय माझ्यात ? म्या केलं तुमाला माफ ऽ! पण लक्षात ठेवा पाटील,? इथून जर अन्याय केलात तर गय केली जाणार न्हाय..."[४२] असे म्हणून रक्ताच्या थारोळ्यात स्वत:चा जीव गमावतो.

## परंपरागत जाती व्यवस्थेला बळी पडलेल्या व्यक्ती:

'परिवर्तन', 'सौदा' आणि 'मायचं सपान' या कथेतील दलित नायक जातिभेदाला बळी पडलेला दिसून येतो. 'परिवर्तन' या कथेमध्ये परिवर्तनाची संकल्पना घेऊन मांडवा खेडेगावात सत्यविजय माने नावाची व्यक्ती शिक्षक म्हणून रूजू होते आणि गावातील शाळेबरोबर गावच्या लोकांच्या मदतीने गावसुधारणा करतात. 'पाणी आडवा, पाणी जिरवा' या योजना राबवून शिवारात बंधारे बांधून गावाला एक आदर्श गाव म्हणून नावारूपाला आणतात. गुरुजींचे परिवर्तनाचे स्वप्न साकार होत असताना गुरुजी जेव्हा प्रतिभा भोसले या समाजसेविकेबरोबर नोंदणी विवाह करुन मांडवा गावामध्ये 'परिवर्तन' नावाचे छोटेसे घर बसविण्यासाठी येतात. तेव्हा मात्र त्याच्यावर गावातील लोक हा अस्पृश्य जातीतील असावा म्हणून त्याच्यावर खूप अन्याय करतात. त्याची गाढवावरून धिंड काढतात. तेव्हा गुरुजी आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध प्रतिकार न करता महाराष्ट्रातील सर्व संघटनेकडे न्याय मागण्याचा प्रयत्न करतात. पण तो न्याय त्यांना दिला जात नाही. गौतम कांबळे हा गुरूजींचा विद्यार्थी मागास जातीचा असून देखील माणूसकीच्या नात्याने तो गुरुजींना आधार देतो. अचानक एक दिवस गुरुजींची बदली होते आणि सत्यविजय माने गुरुजी आपल्या पत्नीला घेऊन त्या गावचा निरोप घेतात. त्यावेळी त्यांना आधार देणारा त्यांचा विद्यार्थी गौतम कांबळे गुरुजींना विचारतो, "सर, तुम्ही कोणत्या गावी जात आहात ?"[४३] त्यावर गुरुजींनी दिलेले उत्तर आदर्शवादी वाटते ते म्हणतात, "जेथे मला माणूस म्हणून जगता येणार आहे. ज्या गावात माझ्या स्वत: जीवनात परिवर्तन करून जगण्याचे बळ येणार आहे. ज्या उजाड माळरानावर मला पळस होवून फुलता येईल? ज्या गावात एखाद्याने केलेली चांगली सेवा, कार्य दुसऱ्या

एखाद्या व्यक्तीस पाहू, ऐकू किंवा करू वाटत नसेल? तर त्या दुसऱ्या व्यक्तीने स्वत: चांगले कार्य, सेवा करावे. मग येणारी पिढी त्याचा कित्ता गिरवेल... नव परिवर्तन करण्यासाठी ऽऽऽ"[४४] 'सौदा' या कथेतील वसंता दलित असूनही मानवतावादी दृष्टिकोन ठेवणारी व्यक्तिरेखा दिसून येते. पांढरपेशा वर्गातील कुसुमवर प्रेम करणाऱ्या वसंताला जेव्हा कुसुम लग्नाविषयी विचारते तेव्हा वसंता म्हणतो, "आगं कुसुम, मी कावळा आहे, आणि तू चिमणी आहेस. कावळ्याचे घर शेणाचे असते, तर चिमणीच घर मेणाचं असतं. कावळ्याचे संस्कार, सावली आणि सहवाससुद्धा अपशकून मानला इथल्या मनुवादी संस्कृतीनी ? तो कावळा अपशकूनी म्हणजे अस्पृश्य...! तरी ही त्याचे घर मानवतेचे असते."[४५] मनुवादी संस्कृतीने ज्याला अस्पृश्य म्हणून हिनवले गेले त्या तरूण वसंताचे प्रेम अयशस्वी होते आणि तो परिस्थितीपुढे हतबल होताना दिसतो. 'मायचं सपान' या कथेतील गणपत हा दलित नायक प्रभावशाली वाटतो. आपल्या आईच्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी शिक्षणासाठी औरंगाबादला गेलेला गणपत हा मनिषा या मुलीच्या प्रेमात पडतो आणि त्या मृगजळाच्या इतके मागे धावतो की, त्याला आपल्या गरीब, कष्टाळू व आपल्या शिक्षणासाठी वाट्याला आलेले दु:ख भोगणाऱ्या आईला विसरतो. पण जेव्हा त्या प्रेमात जात, स्पृश्य-अस्पृश्य याची बीजे मनिषाकडून पेरली जातात तेव्हा मात्र त्याला वास्तवाची जाणीव होते आणि तो म्हणतो, "आगं मनिषा प्रेम हे आंधळ असतं म्हणतात, प्रेमामध्ये गरीब आणि श्रीमंत, अस्पृश्य आणि स्पर्श भेद असू शकत नाही. त्यासाठी अंत:करण मोठं असायला पाहिजे?"[४६] या वास्तवतेच्या जाणिवेतूनच तो मागण्यासाठी सर्व दलित नेत्यांचा चाललेल्या मोर्चाकडे धाव घेतो.

### समाजातील बुरखाधारी व्यक्तींचे वर्तन उघडकीस आणणाऱ्या व्यक्ती :

'देवकामायचं श्याडं' या कथेतून गावाला अंधश्रद्धेच्या नावाखाली सर्वसामान्य भोळ्या-गरीब लोकांना लुबडणारी देवकामाय हिचे नाटकी वर्तन गावातील लोकांसमोर आणण्यासाठी जयवंतराव कांबळे गुरुजी, सामाजिक कार्यकर्ता केशवराव अण्णा आणि तुळशीराम गुरुजी या प्रतिष्ठीत व्यक्ती प्रयत्न करताना दिसतात. देवकामायच्यां अंगात येणे म्हणजे तिने पोट भरण्यासाठी उघडपणे चाललेला व्यवसाय असतो. त्यामुळे त्या देवकामायला

धडा शिकविण्यासाठी या तिघांनी लेखकावर जबाबदारी टाकली. लेखकाला नाटकाचा अनुभव असल्यामुळे त्याने स्त्री वेष धारण करुन, एखाद्या घरंदाज स्त्री प्रमाणे नटून-थटून लेखक देवकामायच्या घराकडे जातो. पण ती स्त्री नसून पुरुष आहे याची फुसटशी जाणीव देखील देवकामायला येत नाही. त्यामुळे ती मोठ्याने ओरडत म्हणते, "ओ ऽ हं...! अ...ह ऽऽ रंडे ऽ! दुस्मने ऽ! लई पाप केलीस गं... बाईच्या जातीला येऊन ? त्यावर लेखक म्हणतो की, "माय, माझा काय अन्येव झाला ते तरी सांगा व ? "मी म्हणालो.

"तुझं गतसाली लगीन झालय," धुरपतमाय बोलली

"व्हयं माय, तू म्हणतेस ते खर हाय."

"तुझ्या पाठीपोटी कोणीच न्हाय ? तू धुरपतमायला दूर केलीस ? "

"म्या दूर केलेव माय ऽ ? पण माझं पोटपाणी पिकायचं सांगा, माय ? "[४७] असे म्हणून स्वत: लेखकाने देवकामायकडे त्यावर उपाय विचारला असता त्यावर स्वार्थी देवकामाय म्हणाली, "आगं, तू मायला एक जरीचं पातळ नेसवं ? नितनेम धुरपतमायच्या फोटोची पुजा करीत जा ? मग, येत्या गडचांदीयाच्या मायच्या वरीला तुझ्या नवऱ्याबरूबर लेकरूबी घेऊन जा."[४८] पण देवकामायचं खरे रूप लोकांसमोर आणण्यासाठी स्वत: लेखक तिच्या अंगावर चुरचुरीची पुडी टाकतो तसं देवकामाय अग्यावेताळ उठल्यागत ओरडू लागली, "आगं...गं...गं रंडे ऽ! तू लई अन्येव केलीस ? तू वरच्या आळीच्या खाल्त शेताला जावून विपरीत केलीस ? त्वा तुला मसोबा जवळचा रानगा धरलाय ?"[४९] असे म्हणून देवकामाय खरूज झालेल्या माणसारखी अंग खाजवू लागली. हे सर्व पाहूण लोक सैर-वैर धावू लागले तेव्हा गावातील समाजसुधारक लोकांनी गावातील लोकांना थोपवून देवकामायच पितळ उघडे पाडतात.

## प्रामाणिकपणा सिद्ध करणाऱ्या व्यक्ती :

'मालकीनबाय' या कथेतील सदाशिव हा गंगाधर पाटलाचा विश्वासातील नोकर असल्यामुळे तो मालकाची शेती व्यवस्थित सांभाळत असे. मालकालाही मोठमोठ्या प्रसंगात मदत करायला नेहमी तत्पर असे. त्यामुळे मालक सदावर वाड्याची संपूर्ण जबाबदारी टाकून तालुक्याच्या कामाला जातात. त्यामुळे तो आपल्या आजारी आईकडे दुर्लक्ष करुन मालकाचा

हुकूम पाळण्यासाठी तो रात्रीचाच वाड्यावर वस्तीवर येतो. पण जेव्हा गंगाधर पाटलाची विवाहित मुलगी शुभांगी सदाशी लगट करण्याचा प्रयत्न करते तेव्हा मात्र सदा गोंधळून जातो व शुभांगीला बाजूला सारून म्हणतो, "मालकीनबाय, मला माफ करा जी, म्या खात्या भाकरीला जागणारा माणूस हाय. म्या ह्या पवित्र वाड्याला कधीच काळींबा फासणार नाय बघा! तसा मालकाचा माझ्यावर ईस्वास हाय. आजून म्या ईमान इकलं नाय जी, मालकीनबाय ?"[५०] असे म्हणणाऱ्या सदाला मात्र शेवटी त्याने केलेल्या प्रामाणिकपणाबद्दल, ईमानदारीबद्दल तसेच निष्ठेने केलेल्या सेवेचा मोबदला म्हणून त्याला मालकाच्या हातून स्वत:चा जीव गमवावा लागतो. 'गोंदण' या कथेतील तरूण फौजदार सर्जेराव पाटील रावसाहेब देशमुखाच्या खुनाची छाननी करताना आलेले अनुभव आणि त्याच्याकडे असलेल्या मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो. तर 'मालकीनबाय' कथेतील गंगाधर पाटील ही व्यक्तिरेखा फारशी प्रभावशाली नाही. तर 'तमाशा' या कथेतील आधुनिक विचारांचा सुशिक्षित साहेबराव देशमुख हे पात्र परिवर्तनीय विचाराचे वाटते.

**'भूकबळी' मधील भाषाशैली :**

कोणत्याही साहित्यकृतीचा अभ्यास करताना भाषाशैली हा घटक महत्त्वाचा ठरतो. भाषेमध्ये संवाद साधण्याची शक्ती असते. विचार व भावनांना व्यक्त करण्याचे प्रभावशाली माध्यम म्हणजे भाषा होय. मानवाच्या सुख-दु:खाची, विचारांची, कल्पनांची, भावनांची देवाण-घेवाण भाषेमुळे होत असते. समाजातील तो एक अविभाज्य घटक समजला जातो. भाषेविषयी गंगाधर पानतावणे म्हणतात, "भाषा हे सामाजिक अभिसरणाचे महत्त्वाचे घटकरूप आहे. समाजात वेगवेगळ्या व्यक्ती व व्यक्ती समूह सतत आपापल्या संस्कृतीचे अविष्करण घडवित असतात ते आपापल्या भाषा माध्यमातून."[५१] लेखक सर्वसामान्य वाचकांपासून उच्चअभिरूचीच्या समीक्षकांपर्यंत भाषेच्या माध्यमातूनच संवाद साधत असतो. जसा लेखक तशी त्याची शैली असे म्हटले जाते. शैली म्हणजे, "भाषिक घटकांच्या संदर्भजन्य शकयतांचे एकत्रीकरण म्हणजे संहितेची शैली होय."[५२] त्याच्या लिखाणावरून लेखक ओळखला जातो. कथेसारख्या वाङ्मयप्रकारासाठी लेखक जी भाषा वापरतो. ती त्याची 'स्व'



16119

बोली असते. लेखक ज्या समाजात, संस्कृतीत वाढताना, वावरताना, जीवनाचा अनुभव घेत असताना त्याने जी भाषा अनुभवलेली, जगलेली असते तिचे प्रभावीपणे चित्रण तो कलाकृतीच्या माध्यमातून करतो. त्यात एक प्रकारचा जिवंतपणा निर्माण झालेला असतो. अलंकारिक भाषेचा बोजडपणा बाजूला सारून बोली भाषेच्या माध्यमातून कलाकृतीला जिवंतपणा आणून देतो. लेखकाला वास्तव जीवनात वावरत असताना बरे-वाईट अनुभव येत असतात. त्याचे प्रकटीकरण त्याचा आविष्कार तो बोली भाषेच्या माध्यमातून करतो. लेखक प्रदेशनिर्विष्ट आणि जातिविशिष्ट अशी भाषा वापरतो. भाषाशैली संदर्भात प्रा.ना.सी.फडके म्हणतात, "भाषाशैली अंगी आणावयाची असेल तर शब्दांचे अर्थ व ध्वनी यांच्या संवाद-विसंवादाचा तर लेखकाने अभ्यास केलाच पाहिजे. पण शब्दांच्या योगाने बनणाऱ्या वाक्यातही अनेक प्रकारचे नादगुण कसे उत्पन्न होतात व त्यांच्या अर्थ परिपोषाकडे कसा उपयोग करता येईल याचाही सुक्ष्म विचार त्यास फार सहाय्यक होईल... प्रत्येक सुंदर वाक्यास एक प्रकारची लय असते."[५३] लेखकाची स्वत:ची अशी एक भाषाशैली असते. त्या भाषेमध्ये संवादात्मकता असते.

विलास सिंदगीकरांची चित्रणाची भाषाशैली वास्तव वाटते. त्यामुळे तिच्यात कृत्रिम सौंदर्यानुभापेक्षा वास्तवतेचा नैसर्गिक अनुभव चित्रित करण्याचे कौशल्य दिसून येते. सिंदगीकर हे मराठवाड्यातील एक संवेदनशील लेखक आहेत. मराठवाड्यासारख्या परिसरातील बोलीभाषा, सर्वसामान्यांच्या तोंडातून बाहेर पडणारी भाषा ही त्याचाच सुख-दु:खाचा आलेख मांडतो.

उदा. 'भेट' या कथेतील लेखकाला आलेल्या वास्तव अनुभवातील मांडणीतील भाषाशैली मराठवाडा प्रदेशातील रंग रूपासह वावरते. ती पुढीलप्रमाणे-

"पुन लागलं जी बापुतुपलं, मह्यासारख्या गरीबाले तुम्ही जागा दिले म्हणून शान!"

"गाडी काय कुणाची बांधलेली असते का" ? मी

"तसं नाय जी बापू, तुपले सारखे लोक मह्यासारख्या गरीबाले जवळ बसू नाय देत."

"तुम्ही काय माणूस नाहीत का?"

"व्हय जी... बापू बरीक मपले म्या गरीब हाये."[५४]

तसेच त्यांनी काही ठिकाणी गीतांचाही वापर केलेला दिसून येतो. 'भेट' या कथेमध्ये लेखक प्रवास करीत असताना 'नगर' हा शब्द ऐकताच त्यांनी शाहीर निवृत्ती पवार यांनी गायिलेली "आगं ये ऽ आंबराईत सिरू... जरा गंमत करू... नगर माझं गांव..."[५५] या गाण्याचा उल्लेख लेखकाने केलेला दिसून येतो. तर 'देवकामायचं श्याडं' या कथेत देवीच्या गीतांचा वापर करण्यात आला आहे ती गीत म्हणजे, "इथून गं मला दिसं...सव्वा हात गादी उंच ये ऽऽ धुरपतामाय ऽऽ![५६] दुसरे गीत, "गार...गार...हिवाळ्याची हवा, मायला सोसना गारवा... | | |[५७]

विलास सिंदगीकरांनी साध्या-सरळ निवेदनातून अनुभवाचे नेमकेपणा हेरून आपल्या 'स्व' भाषाशैलीतून अनुभवाला नेमका आकार देण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांनी आपल्या काही कथांमध्ये नादप्रत्ययी भाषेचा यशस्वीपणे वापर केलेला दिसून येतो तो पुढीलप्रमाणे,

- हालगीच्या आवाजाचे वर्णन 'डंग ऽ डंग ऽऽ डंग ऽऽऽ ड्यांगचीक... ड्यांगचीक, चिकज्यांग...ज्यांगजंग... ज्यांगचीक चीक...चीक ऽऽऽ!!!"[५८]
- गजरा जेव्हा मोठ्याने ओरडते त्याचे वर्णन, "आर माझ्या बापा ऽ! म्या मेलावरं...दौल्या...मला वाचव रं...! किड्यानं सिवलं रं...मला? म्या वाचनावरं... बापाऽ? "[५९]
- मंजुळे ऽ उठ की ग...? कोंबड्याने बाग दिलाय!"[६०]

त्याचप्रमाणे त्यांनी कथेला आकर्षक रूप देण्यासाठी काही लावणी गीतांचाही वापर केल्याचे दिसून येते. तर काही ठिकाणी शिव्याचाही वापर केलेला दिसून येतो. या भाषिक प्रयोगातून त्यांनी आपली कथा प्रत्ययकारी बनवलेली आहे. त्याचप्रमाणे सिंदगीकरांनी प्रमाण भाषेबरोबर इंग्रजी भाषेचा वापर केलेला आहे. उदा. गुड मॉर्निंग माय डिअर फ्रेंड, थँक्यू इत्यादी शब्द तसेच हिंदी गीताचाही वापर केलेला दिसून येतो. एकूण सिंदगीकर यांच्या कथेची भाषाशैली ग्रामजीवनातील नानाविध वास्तव भावसंवेदना शब्दांकित करते.

## निष्कर्ष :

१. ‘भूकबळी’ या कथासंग्रहामध्ये प्रामुख्याने स्त्री अस्तित्वाचा शोध घेणाऱ्या जशा कथा दिसून येतात. त्याचप्रमाणे पुरुषसत्ताक संस्कृतीचे चित्रण करणाऱ्या दिसून येतात.

२. ‘भूकबळी’ या कथासंग्रहातील बऱ्याच कथांमधून वास्तववादी घटनेला दु:खद अनुभवाने कथानकाला कलाटणी दिल्याचे दिसून येते.

३. परंपरागत जीवन जगताना परंपरेने लादलेल्या सामाजिक, सांस्कृतिक अवडंबराचा मारा सहन करीत असताना या कथासंग्रहातील बऱ्याच स्त्री व्यक्तिरेखा मृत्यूला कवटाळताना दिसतात.

४. त्याचबरोबर या कथासंग्रहातील ठराविक कथा अशा आहेत की, त्यांच्यामधून शरीर सुखासाठी आसुसलेली स्त्री दिसून येते.

५. याउलट कसल्याही मोहाला बळी न पडता स्वाभिमानी जीवन जगणारी स्त्री पहावयास मिळते.

६. समाजात अंधश्रद्धेच्या नावाखाली लुबाडणारी स्त्री देखील पहावयास मिळते.

७. स्त्री व्यक्तिरेखांबरोबर पुरूष व्यक्तिरेखांचा ही शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यामध्ये बेरकी, स्वार्थी प्रामाणिक, धाडसी, जातीव्यवस्थेला बळी पडणाऱ्या व्यक्ती यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

८. कथांची वापरलेली भाषा अनलंकृत, बोजड नसलेली मराठवाड्याच्या बोली भाषेचा अस्सल नमुना त्यांच्या कथांच्या माध्यमातून पाहावयास मिळातो.

९. ग्रामीण गावगाड्याचे व ग्रामसंस्कृतीचे प्रभावी चित्रण ‘भूकबळी’ यामध्ये प्रतिबिंबित झाले आहे.

## संदर्भ :


| | | | |
|---|---|---|---|
| १. | अनुष्टुभ | - | जुलै / ऑगस्ट १९९६. वर्ष विसावे / अंक पहिला पृ.१८ |
| २. | डहाके, वसंत आबाजी | - | 'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश', जी.आर.भटकळ फाउण्डेशन, मुंबई पहिली आवृत्ती डिसेंबर २००१ पृ.११७ |
| ३. | अनुष्टुभ | - | जुलै / ऑगस्ट १९९६. वर्ष विसावे / अंक पहिला पृ.१८ |
| ४. | डहाके, वसंत आबाजी | - | उ.नि.पृ.३४ |
| ५. | यादव, आनंद | - | 'साहित्याची निर्मिती प्रक्रिया', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, प्रथमावृत्ती जानेवारी - २००२, पृ.९८ |
| ६. | पोवार, प्रा.डॉ.छाया | - | 'मराठी नागर कथा', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथमावृत्ती ३१ ऑगस्ट २००३ पृ.१०८ |
| ७. | सिंदगीकर, विलास | - | 'भूकबळी', केदार ऑफसेट, उषाकिरण टॉकीजमागे, कैलास नगर, लातूर, प्रथमावृत्ती २१ एप्रिल २००३, पृ.३८. |
| ८. | सिंदगीकर, विलास | - | पृ. ३९ |
| ९. | तत्रैव | - | पृ. ७ |
| १०. | तत्रैव | - | पृ. ५१ |
| ११. | तत्रैव | - | पृ. १२५ |
| १२. | तत्रैव | - | पृ. २४ |
| १३. | तत्रैव | - | पृ. २५ |
| १४. | तत्रैव | - | पृ. १३ |
| १५. | तत्रैव | - | पृ. १४ |
| १६. | तत्रैव | - | पृ. १०१ |
| १७. | तत्रैव | - | पृ. १०२ |

१८. तत्रैव - पृ. १०२

१९. तत्रैव - पृ. ४६

२०. तत्रैव - पृ. ४७

२१. तत्रैव - पृ. १११

२२. तत्रैव - पृ. ७६

२३. तत्रैव - पृ.८१

२४. तत्रैव - पृ. ८३

२५. तत्रैव - पृ. ३१

२६. तत्रैव - पृ. ११७

२७. तत्रैव - पृ. ११७

२८. तत्रैव - पृ. ५४

२९. तत्रैव - पृ.१२२

३०. तत्रैव - पृ.१२२

३१. तत्रैव - पृ.६५

३२. तत्रैव - पृ.६५

३३. तत्रैव - पृ.३

३४. तत्रैव - पृ.३

३५. तत्रैव - पृ.१०

३६. तत्रैव - पृ. १२

३७ तत्रैव - पृ. १३

३८. तत्रैव - पृ. ४०

३९. तत्रैव - पृ. ४१

४०. तत्रैव - पृ.४२

४१. तत्रैव - पृ.४३

४२. तत्रैव - पृ.१२८

४३. तत्रैव - पृ.७३

४४. तत्रैव - पृ.७३

४५. तत्रैव - पृ.१११

४६. तत्रैव - पृ.५४

४७. तत्रैव - पृ.८२

४८. तत्रैव - पृ.८२

४९. तत्रैव - पृ.८२

५०. तत्रैव - पृ.२५

५१. पानतावणे, डॉ.गंगाधर - 'साहित्य प्रकृती आणि प्रवृत्ती', स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद, आवृत्ती पहिली ऑगस्ट - १९९९, पृ.९

५२. डहाके, वसंत आबाजी - उ.नि.पृ. ३७५

५३. फडके, ना.सी. - प्रतिभासाधन, मुंबई सहावी आवृत्ती, १९७६. पृ.२२९

५४. सिंदगीकर, विलास - उ.नि.पृ.३७

५५. तत्रैव - पृ.३६

५६. तत्रैव - पृ.८०

५७. तत्रैव - पृ.८०

५८. तत्रैव - पृ.७७

५९. तत्रैव - पृ. ११४

६०. तत्रैव - पृ.११५